# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.10.2024** **वार – शनिवार**

---

पुणे शहर आणि जिल्ह्यातील निर्जन स्थळी पोलीस चौकी अद्ययावत कराव्यात, सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, गस्त वाढवावी आणि त्यावेळी सायरनचा वापर करावा असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉक्टर यांनी आज पुणे पोलिसांना दिले. पुणे शहर तसंच परिसरात गेल्या काही दिवसात महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना लक्षात घेता पोलीस विभागानं अधिक सतर्क राहण्याचे निर्देश दिल्याचं त्यांनी पोलीस आयुक्त कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत सांगितलं. यावेळी पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार उपस्थित होते.

**<u>प्रदर्शन</u>**
रमाबाई आंबेडकर महिला सबलीकरण केंद्रातर्फे आयोजित 'धागा' या स्वदेशी मेळ्याचं उद्घाटन काल माजी मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते पुण्यात करण्यात आलं. याप्रसंगी संयोजक आणि राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी, प्रामुख्यानं उपस्थित होत्या. यावेळी विविध क्षेत्रातील महिलांना यशस्वी उद्योजिका पुरस्कारानं मुंडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आलं. उद्यापर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुलं राहील.

**<u>घोले</u>**
पुणे महापालिकेच्या घोले रस्त्यावरील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहाच्या स्थापत्यविषयक देखभाल-दुरुस्तीची कामं करण्यासाठी अंदाजे 64 लाख रुपयांच्या निविदेला स्थायी समितीनं मान्यता दिली आहे. या वसतिगृहामध्ये अकरावी ते पदवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. पुणे महापालिकेनं कोट्यवधी रुपये खर्च करून हे वसतिगृह उभारलं आहे. पण सध्या त्याची दुरवस्था झाली आहे.

**<u>बडतर्फ</u>**
अमली पदार्थ तस्कर ललित पाटील प्रकरणात बडतर्फ करण्यात आलेल्या महिला पोलीस उपनिरीक्षकासह पाच जणांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणानं दिलेल्या निर्णयानुसार पुन्हा सेवेत घेण्यात आलं आहे. पुण्यातील ससून रुग्णालयातून अमली पदार्थ तस्करी करणारा ललित पाटील पोलिसांचा बंदोबस्त असताना पळून गेला होता. पोलिसांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळं पाटील पळून जाऊ शकला या आरोपावरून या पोलीस कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आलं होतं.

**<u>बारणे</u>**
पुणे आणि रायगड या दोन जिल्ह्यांचा समावेश असलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रयत्नांनंतर राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून 44 कोटी 10 लाख कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. या निधीतून पूर, दरड प्रतिबंधक उपयोजना करण्यात येणार आहेत. मावळमध्ये मोठ्या प्रमाणात दरडी आणि पूरप्रवण क्षेत्र असल्याचं बारणे यांनी सांगितलं.

**तक्रारी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या विविध सेवा सुविधा आणि कामकाजाबाबत नागरिकांच्या आलेल्या तक्रारींचा विभागनिहाय सर्वंकष आढावा आयुक्त शेखर सिंह यांनी घेतला आणि सबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. विविध माध्यमांतून येणाऱ्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्यावर आवश्यक कार्यवाही करून सबंधित विभागाद्वारे तक्रारींचं विहित वेळेत निराकरण करण्यासाठी सर्वांनी योग्य समन्वय ठेवून सूक्ष्म नियोजन करावं इत्यादि सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

**प्रशिक्षण**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कामगार कल्याण विभाग आणि यशदा यांच्याद्वारे संयुक्तपणे माहिती अधिकार अधिनियमाच्या अनुषंगानं एका प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात मुख्य प्रशिक्षक रेखा साळुंखे माहिती अधिकार कायद्याचा इतिहास, स्वरूप, उद्दिष्ट, व्याप्ती, कायद्यातील महत्त्वाच्या संकल्पना, जन माहिती अधिकारी पदनिर्देशन, समुचित शासनाच्या जबाबदाऱ्या, सार्वजनिक प्राधिकरण अशा विविध बाबींची माहिती दिली. तसंच माहितीचा अधिकार हा राज्यकारभारात पारदर्शकता आणि खुलेपणा निर्माण करणं, शासन यंत्रणेमध्ये नागरिकांच्या प्रति उत्तरदायित्व निर्माण करणं, राज्यकारभारातील भ्रष्टाचाराला आळा घालणं, माहिती मिळविण्यासाठी सुलभ यंत्रणा उभारणं यासाठी असल्याचं त्यांनी सांगितलं.

**सजग**

महाराष्ट्रातील विविध सामाजिक संस्थांच्या पुण्यात झालेल्या बैठकीत विकसित महाराष्ट्रासाठी आगामी विधानसभा निवडणुकीत ‘सजग रहो’ या अभियानाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचण्याचा निर्धार केल्याची माहिती पुण्यात पत्रकार परिषदेत देण्यात आली. ‘सजग रहो’ अभियानाच्या वतीनं यासंदर्भात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ज्येष्ठ माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते क्षितिज टेक्सास गायकवाड, गिरीश प्रभुणे, दलित साहित्याचे अभ्यासक डॉक्टर धनंजय भिसे, विधीज्ञ अभिजित देशमुख यांनी माहिती दिली.

श्रेष्ठ महाराष्ट्र – विकसित महाराष्ट्र हा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात जनजागृतीकरिता ‘सजग रहो’ हे अभियान सुरु करून ते राबवण्याचा महत्वाचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

**टेटे**

टेबल टेनिसमधील पुणे जिल्ह्यातील मानाची समजली जाणारी बालुफ चषक स्पर्धा आजपासून सुरु होत आहे. या स्पर्धेत तीनशेहून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला असून ही स्पर्धा पुरुष एकेरी आणि दुहेरी, महिला एकेरी, विविध वयोगटातील मुले आणि मुली, ४० वर्षावरील प्रौढ एकेरी आणि दुहेरी या गटांमध्ये होत आहे. 9 ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेतील विजेत्यांना ८५ हजार रुपयांची पारितोषिकं दिली जाणार आहेत.

पुणे आणि परिसरात उद्या वीजांसह पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे. कमाल तापमान 32 अंश सेल्सियस राहील.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**